विठठ्लवाडी वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २५ /२०२६ दि. २३/०१/२०२६

'वाहतूक नियंत्रण अधिसूचना'

ज्याअर्थी, विठ्ठलवाडी वाहतूक उपविभागाचे हददीत दि.२९/०१/२०२६ रोजी पासुन ते दि.०७/०२/२०२६ रोजी पावेतो **' श्री मलंग बाबा दर्गा उरूस (संदल) २०२६'** साजरा करण्यात येणार असून सदर ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होवून वाहतूक कोंडी निर्माण होणार आहे. नमूद कालावधीत श्री मलंग गड व नेवाळी नाका या ठिकाणी जड अवजड वाहनांचे वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

प्रवेश बंद – १) शिळफाटा कडुन नेवाळी नाका श्रीमलंग वाडी कडे येणाऱ्या सर्व जड अवजड वाहनांना **काटई नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने नेतीवली , टाटा पॉवर व मानपाडा पोलीस स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) नवी मुंबई तळोजा कडुन नेवाळी नाक्या कडे येणाऱ्या सर्व जड अवजड वाहनांना **खोणी नाका (निसर्ग हॉटेल)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने खोणी नाका येथुन डावीकडे काटई नाका दिशेने वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद– ३) बदलापुर कडुन नेवाळी नाका, श्री मलंगवाडी, नवी मुंबई व ठाणे शहराकडे जाणाऱ्या सर्व जड अवजड वाहनांना **टि पॉईट, शिवाजी नगर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग– सदरची सर्व जड अवजड वाहने अंबरनाथ टि पॉईट येथे उजवीकडे वळण घेवुन फॉरेस्ट नाका व साई बाबा मंदिर मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना दि.२९/०१/२०२६ रोजी पासुन ते दि. ०७/०२/२०२६ रोजी पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगर परिषद.

प्रत **कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, **कल्याण**

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावून घ्यावीत.